माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य, माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : २३७/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री. अभय कोलारकर**
--विरुध्द--

**जन माहिती अधिकारी तथा शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर, दिक्षाभुमी समोर नागपूर**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर, दिक्षाभुमी समोर नागपूर**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २५.०१.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | उपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | अनुपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | अनुपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| ०४.०४.२०१८ | --- | २२.०८.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. ५७६/२०२०, दिनांक ०४.०४.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक २५.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री. अभय कोलारकर उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर, नागपूर श्री. प्रमोद प्रभाकर राउत उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय (अपील क्र. ५७६/२०२०) मध्ये दिनांक ०४.०४.२०२२ रोजी

सुनावणी घेवून " जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अर्ज व प्रथम अपील अर्ज हाताळला आहे. माहिती अधिकार कायाद्याची चूकीची व्याख्या केलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस झालेल्या मानसिक व शारिरीक त्रासापोटी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (ख) नुसार रु. १०,०००/- (अक्षरी दहा हजार रुपये फक्त) नुकसान भरपाई धनादेशाव्दारे प्रदान करावी. वरील नुकसान भरपाई अपिलार्थीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वसूल करावयाचे अधिकार हे कार्यालय प्रमुखांना असतील. वरील नुकसान भरपाई सदर आदेश प्राप्त होताच ४ आठवड्याच्या आत अपिलार्थीस प्रदान करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी. ." असे आदेशीत करून प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २२.०८.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी श्री. कोलारकर यांनी दाखल केलेल्या अपिल क्र. ५७६/२०२० , मध्ये दि. ०४.०४.२०२२ रोजी झालेल्या सुनावणीत दरम्यान, अपिलार्थी यांनी दि. १०.१२.२०१९ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर, नागपूर श्री. प्रमोद राऊत यांनी दि. ०६.१.२०२० रोजी अपिलार्थी यांना दिलेल्या उत्तरात सादर केलेल्या माहिती अधिकार अर्जाचा महाविद्यालयाशी कोणताही प्रत्यक्ष संबंध नसल्यामुळे अपेक्षित माहिती निरंक आहे, असे अपिलार्थीस कळविले. त्यावर अपिलार्थी यांनी दि. २२.०१.२०२० रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल करण्यात आले. प्रथम अपिल अर्जावर सुनावणी न आयोजित करता श्री. प्रमोद राऊत यांनी दि. १३.०३.२०२० रोजी प्रथम अपिल अर्ज परस्पर निकाली काढले.

माहितीचा अधिकार कायद्यातंर्गत ज्या माहितीचा स्वत:च्या ग्रस्ततेशी संबंधित नाही, अशी माहिती मागविण्याचा कोणत्याही नागरीकास अधिकार नाही. अशी कोणतीही तरतूद कायद्यात नाही. अशी व संविधानाला ती अपेक्षित नाही. त्यामुळे आपणास अपेक्षित असलेली माहिती निरंक आहे, असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थी यांनी त्याविरुध्द दाखल केलेल्या व्दितीय अपिल अर्जात, जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेली भूमिका माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम ६ (२) नुसार विसंगत असुन, या पद्धतीने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्ज हाताळला आहे. हा माहिती अधिकार कायद्याचा धडधडीत उल्लंघून असुन त्याविरुध्द कठोर कारवाई करावी असे सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी मागणी केली. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कुठल्याही त्रयस्थ पक्षाशी माहिती नसल्याचे सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी कुठल्याही उच्च न्यायालयाचा दाखला न देता ज्या पद्धतीने माहिती अर्ज हाताळला आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये, शास्ती कारवाई का करण्यात येवू नये? याबाबत सूचना निर्गमित करण्यात आले. सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी आदेशाची प्रत तत्कालिन जनमाहिती अधिकारी श्री.प्रमोद राऊत यांना पाठविण्याबाबतची खातरजमा करण्याबाबत विनंती केली आहे.

सुनावणी घेवून " जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अर्ज व प्रथम अपील अर्ज हाताळला आहे. माहिती अधिकार कायद्याची चूकीची व्याख्या केलेली आहे. त्यामुळे अपिलार्थीस झालेल्या मानसिक व शारिरीक त्रासापोटी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (ख) नुसार रु. १०,०००/- (अक्षरी दहा हजार रुपये फक्त) नुकसान भरपाई धनादेशाव्दारे प्रदान करावी. वरील नुकसान भरपाई अपिलार्थीस माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वसूल करावयाचे अधिकार हे कार्यालय प्रमुखांना असतील. वरील नुकसान भरपाई सदर आदेश प्राप्त होताच ४ आठवड्याच्या आत अपिलार्थीस प्रदान करावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी. ." असे आदेशीत करून प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २२.०८.२०२२ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी श्री. कोलारकर यांनी दाखल केलेल्या अपिल क्र. ५७६/२०२० , मध्ये दि. ०४.०४.२०२२ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान, अपिलार्थी यांनी दि. १०.१२.२०१९ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर तत्कालिन जनमाहिती अधिकारी तथा शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मीनगर, नागपूर श्री. प्रमोद राऊत यांनी दि. ०६.१.२०२० रोजी अपिलार्थी यांना दिलेल्या उत्तरात सादर केलेल्या माहिती अधिकार अर्जाचा महाविद्यालयाशी कोणताही प्रत्यक्ष संबंध नसल्यामुळे अपेक्षित माहिती निरंक आहे, असे अपिलार्थीस कळविले. त्यावर अपिलार्थी यांनी दि. २२.०१.२०२० रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल करण्यात आले. प्रथम अपिल अर्जावर सुनावणी न आयोजित करता श्री. प्रमोद राऊत यांनी दि. १३.०३.२०२० रोजी प्रथम अपिल अर्ज परस्पर निकाली काढले.

माहितीचा अधिकार कायद्यातंर्गत ज्या माहितीचा स्वत:च्या ग्रस्ततेशी संबंधित नाही, अशी माहिती मागविण्याचा कोणत्याही नागरीकास अधिकार नाही. अशी कोणतीही तरतूद कायद्यात नाही. अशी व संविधानाला ती अपेक्षित नाही. त्यामुळे आपणास अपेक्षित असलेली माहिती निरंक आहे, असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थी यांनी त्याविरुध्द दाखल केलेल्या व्दितीय अपिल अर्जात, जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व घेतलेली भूमिका माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ कलम ६ (२) नुसार विसंगत असुन, या पद्धतीने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्ज हाताळला आहे. हा माहिती अधिकार कायद्याचा धडधडीत उल्लंघन असुन त्याविरुध्द कठोर कारवाई करावी असे सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी मागणी केली. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती कुठल्याही त्रयस्थ पक्षाशी माहिती नसल्याचे सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी कुठल्याही उच्च न्यायालयाचा दाखला न देता ज्या पद्धतीने माहिती अर्ज हाताळला आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये, शास्ती कारवाई का करण्यात येवू नये? याबाबत सूचना निर्गमित करण्यात आले. सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी आदेशाची प्रत तत्कालिन जनमाहिती अधिकारी श्री.प्रमोद राऊत यांना पाठविण्याबाबतची खातरजमा करण्याबाबत विनंती केली आहे.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
नागपूर

अधिकार अधिनियम अतंर्गत कलम ७ (६) नुसार अपिलार्थी यांना माहिती मोफत मिळावी अशी कायदेशीर तरतूद आहे. जनमाहिती स्तरावर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम कलम १९ (१) अन्वये, प्रथम अपिल अर्ज दाखल करण्यात येतात असा प्रथम अपिल अर्ज अधिष्ठाता यांच्याकडे प्रथम अपिल अर्ज सादर केला नाही. मात्र या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी आदेश पारित केल्याचे सादर कागदपत्रावरून दिसून येते. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अर्जावर उत्तर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी परस्पर दिलेला प्रतिसाद माहिती अधिकार अधिनियम, २००५ कायद्याशी विसंगत असून कलम १९ (८) मधील नमूद तरतुदी नुसार कलम १९ (८) (ग) व २० (१) नुसार शास्ती लादणे व कलम १९ (८) (ख) नुकसान भरपाई प्रदान करणे हे दोन्ही अधिकार आयोगास प्रदान आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम २० (१) नुसार राज्य जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचा कोणत्याही अर्ज स्विकार करण्यास नकार दिला किंवा वेळेत माहिती दिली नाही किंवा माहिती जाणूनबुजून दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे किंवा मागितलेली माहिती नष्ट केलेली आहे किंवा माहिती सादर करण्यास कोणत्याहीप्रकारे अडथळा आणला आहे, असे आयोगाचे मत झाले असेल तर तो अर्ज स्वीकारेपर्यंत किंवा माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाचे रुपये २५०/- इतकी शास्ती अथवा अशा शास्तीची एकूण रक्कम रु. २५,०००/- जास्त असणार नाही. अशी शास्ती लादण्यापूवी संबंधित जनमाहिती अधिकारी यांना वाजवी संधी कायद्यात कलम २० (१) नुसार वाजवी होती. त्या अगोदर जनमाहिती अधिकारी यांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल.

वरील प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात व्यापक जनमहिती साधणारी असणारी असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद कलम ७ (१) अन्वये चूकीचा आहे. जनमाहिती अधिकारी यांनी कलम २० (१) अन्वये, जाणूनबुजून माहिती निरंक असल्याचा प्रतिसाद दिला असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून आढळून येते. तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित करणे आवश्यक असून अनधिकृत वापर (Usurp) करणे अपेक्षित नाही. अपिलार्थी यांनी सादर केलेल्या माहिती अर्जाबाबत तत्कालिन जनमाहिती अधिकारी श्री. प्रमोद राउुत यांनी पुर्नविचार अर्जात सादर लेखी निवेदन झालेल्या चूकीबाबत कुठलेही स्पष्टीकरण सादर केलेले नाही. माहिती नाकारण्यास कुठलेही कायदेशीर तरतूद नाही. तसेच कुठल्याही मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालायाचा दाखला देण्यात आला नाही. त्याच्या बचावात लेखी निवेदन असतांना आयोगाने कलम २० (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी रु. २५०००/- शास्तीची रक्कम श्री. प्रमोद प्रभाकर राऊत यांचेकडून वसूल करण्याबाबत दि. ०४.०४.२०२२ रोजी आदेशित केले. कलम ८ (ख) रु. १०,०००/- नुकसान भरपाई रक्कम प्रथम संस्थेव्दारे अदा करणे अपेक्षित असून कार्यालय प्रमुख यांनी विलंबास जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून वसूल करण्याबाबत आदेशित असतांना आदेशाचे अनुपालन न करणे ही गंभीर बाब आहे. माहितीचा अधिकार अधिनियम कलम १९ (८) (ख) नुसार रु. १०,०००/- संबंधित दोषी कर्मचाऱ्याकडून वसूल करण्याचे अधिकार कार्यालय प्रमुखास त्यांच्या स्वेच्छाधिकार आहे. अपिलाथी यांना उपरोक्त नुकसान भरपाई रक्कम प्राप्त न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर त्यांच्याविरुध्द कारवाई

करण्यात येईल. सदर आदेशाची प्रत योग्य त्या अनुपालनासाठी मा. संचालक, मुंबई, मा.संचालक, जिल्हा कोषागार अधिकारी ,जि. नागपूर व अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मी नगर, नागपूर यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण-नागपूर**
**दिनांक-२५.०१.२०२३**

**जा.क्र.**1720**दि.**15 Mar 2023

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग ★नागपूर★

**प्रत- योग्य त्या कार्यवाहीसाठी-**

१. मा. संचालक, मुंबई
२. मा.संचालक, जिल्हा कोषागार अधिकारी, जि. नागपूर
३. अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, लक्ष्मी नगर, नागपूर